महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २३ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३२ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# रक्तदान शिबिरे आणि सामाजिक उपक्रमांनी मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस आहे. देवेंद्र फडणवीस हे आज ५६ व्या वयात पदार्पण करत आहेत. तर अजित पवार वयाच्या ६७व्या वर्षात पदार्पण करत आहेत. वाढदिवसाच्या निमित्ताने या दोन्ही नेत्यांवर राजकीय आणि सामाजिक वर्तुळातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही दोघांना सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. एकनाथ शिंदेंनी शुभेच्छा देताना लिहिलेल्या शब्दांनी लक्ष वेधून घेतले आहे. एकनाथ शिंदे यांनी या दोघांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना त्यांच्यासाठी अनेक विशेषणे वापरली आहेत. शिंदेंनी या दोन्ही नेत्यांची मुक्तकंठाने तारीफ केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना शुभेच्छा देताना "विश्वासाचा हात असू दे, मैत्रीचा सहवास असू दे. महाराष्ट्राच्या उध्दाराचा रात्रंदिन हा ध्यास असू दे. महाराष्ट्राच्या विकासयात्रेचे बिनीचे शिलेदार मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना जन्मदिनाच्या उदंड शुभेच्छा". असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

दरम्यान, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्ताने भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याचाच एक भाग म्हणून कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघातील 5 ही मंडळांमध्ये रक्तदान शिबिर राबवण्यात आले. तर कल्याण विकास फाउंडेशनच्या माध्यमातून जलशुद्धीकरण आणि परिसर स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत आज राज्यभरात अनेक सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र भाजपातर्फे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून संपूर्ण राज्यातील भाजप मंडळांकडून रक्तदान शिबिर घेण्यात आले. कल्याण पश्चिमेतील जुने कल्याण मंडळाचे अध्यक्ष अमित धाक्रस, नविन कल्याण मंडलाचे अध्यक्ष स्वप्निल काठे, मध्य कल्याण मंडल, मोहने मंडल अध्यक्ष नवनाथ पाटील आणि टिटवाळा मंडल अध्यक्ष शक्तीवान भोईर यांच्याकडूनही या पाच ही मंडलांमध्ये रक्तदान शिबिर संपन्न झाले. ज्यामध्ये अनेक रक्तदात्यांसह भाजपच्या पदाधिकारी - कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपल्याचे दिसून आले. कल्याण विकास फाउंडेशनतर्फेही सामाजिक उपक्रमांद्वारे मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण विकास फाउंडेशनच्या माध्यमातूनही विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. माजी आमदार नरेंद्र पवार आणि कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमलता पवार यांच्या पुढाकाराने कल्याण पश्चिमेमध्ये जलशुद्धीकरण आणि परिसर स्वच्छता अभियानाला आजपासून प्रारंभ झाला. या उपक्रमांतर्गत शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांच्या पाण्याच्या टाक्यांची नामांकित कंपनीमार्फत स्वच्छता केली जाणार आहे. यासाठी संबंधित गृहनिर्माण सोसायटीला एक छापील अर्ज भरून कल्याण विकास फाउंडेशनकडे द्यायचा आहे. याचसोबत गृहनिर्माण सोसायटी परिसरात कीटक नाशक आणि धूर फवारणीही या उपक्रमांतर्गत केली जाणार आहे. पावसामुळे बऱ्याचदा अशुद्ध आणि गढूळ पाणी पुरवठा येऊ लागतो. ज्याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊन विविध साथीचे आजार पसरण्याची भीती असते. नागरिकांच्या आरोग्याचा धोका हा धोका टाळण्यासाठी कल्याण विकास फाउंडेशनने हा सामाजिक उपक्रम सुरू केल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली. तर त्यासोबतच परिसराची स्वच्छता हादेखील आरोग्याच्या बाबतीत सर्वात महत्त्वाचा घटक असून हे दोन्ही उपक्रम आयोजित करण्यात आल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.या सर्व उपक्रमांमध्ये भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

---

थोडक्यात महत्वाचे

अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे

## भिवंडी अग्निशमन यंत्रणेवर ताण

### १६० पदांपैकी केवळ ४९ पदांचीच भरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** आगीची घटना किंवा दुर्घटना घडल्यास सर्वात प्रथम अग्निशमन यंत्रणा घटनास्थळी पोहोचते. भिवंडी शहर तसेच ग्रामीण भागातील गोदामांना आग लागल्यास वित्त व जीवितहानी टाळण्यासाठी भिवंडी पालिकेच्या अग्निशमन दलातील जवान नेहमीच एक पाऊल पुढे असतात. भिवंडी पालिकेच्या अग्निशमन दलाकडे यंत्र व वाहनसामग्री पुरेशी आहे; मात्र नोकरभरती रखडल्याने मनुष्यबळाअभावी अग्निशमन दलावर अतिरिक्त ताण येत आहे.

पालिकेच्या अग्निशमन दलातील मुख्य अग्निशामक अधिकारी, उपमुख्य अग्निशमन अधिकारी ही दोन्ही पदे रिक्त आहेत. त्यामुळे प्रभारी भार अधिकाऱ्यांवर सोपवला आहे. तर उपकेंद्र अधिकाऱ्यांच्या मंजूर १२ पदांपैकी केवळ एक पद भरले आहे. तर ११ पदे रिक्त आहेत.

चालकाच्या या मंजूर ३१ पदांपैकी केवळ एक पद भरले आहे. तर, ३० पदे रिक्त आहेत. मुख्य अग्निशमन जवानांच्या मंजूर १५ पदांपैकी एकच पद भरले आहे. १४ पदे रिक्त आहेत. अग्निशमन जवानांच्या मंजूर १०० पदांपैकी केवळ ४६ पदे भरली आहेत. तर, ५४ पदे रिक्त आहेत. त्यामुळे एकूण १६० पदांपैकी केवळ ४९ पदे भरण्यात आली आहेत. त्यामुळे अग्निशमन दलातील जवानांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे.

भिवंडीची लोकसंख्या १४ लाखांच्या घरात आहे. त्यातील सुमारे दहा लाख लोकसंख्या शहरी भागात आहे. त्यामुळे ग्रामीण व शहरी भागासाठी स्वतंत्र यंत्रणेची गरज आहे; मात्र भिवंडी शहर, ग्रामीणसह आसपासच्या ग्रामीण भागात आगींच्या घटना घडल्यास भिवंडी अग्निशमन यंत्रणेवर ताण येत आहे. मागील कित्येक वर्षांत भिवंडी अग्निशमन दलात नोकर भरती झालेली नाही. त्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळाच्या मदतीने ही तारेवरची कसरत अग्निशमन दलाला करावी लागत आहे.

अग्निशमन दलाकडे 1 वॉटर टॉवर 8 अग्निशमन इंजिन, 5 बहुउद्देशीय फायर इंजिन आहेत. वॉटर ब्राउझरची संख्या पाच आहे. मिनी फायर इंजिन सात आहेत. फायर अँड रेस्क्यू व्हॅनची संख्या दोन आहे. जीप एक आहे. तर दुचाकी तीन आहेत.

विशेष म्हणजे, आजही या फायर बाइक एक वर्षांपासून वापराविना पडून आहेत. २०२२ ते २०२४ या मागील तीन वर्षांचा आलेख पाहिल्यास शहरात ४४० तर ग्रामीण भागात याच काळात ३०५ आगीच्या घटना घडल्या. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांमुळे एखादी मोठी घटना घडल्यास जीवीत व वित्तहानी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

## खड्डेमय रस्त्यांवरून नागरिकांचा उल्हासनगर मनपावर संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगर शहरात रस्त्यांची अवस्था अक्षरशः 'खड्डे की रस्ते?' असा प्रश्न निर्माण करत आहे. धोबीघाट ते मच्छीमार्केट रस्ता; तसेच कल्याण-बदलापूर रोडवरील खड्डे वाहनचालकांचे प्राण घेण्याच्या तयारीत असल्यासारखे वाटत आहेत. सततच्या पावसामुळे हे खड्डे अधिक खोल बनले असून, त्यात साचलेल्या पाण्यामुळे वाहनचालकांपासून पादचाऱ्यांपर्यंत सर्वांनाच संकटाचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर शनिवारी उल्हासनगरातील काही रिक्षाचालकांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. धोबीघाट ते मच्छीमार्केट रस्त्यावरील खोल खड्डयांमध्ये बसत त्यांनी महापालिकेच्या ढिसाळ कारभारावर जोरदार टीका केली. नागरिकांचाही या आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळाला. दरम्यान, या प्रकाराकडे प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने रस्त्यांची डागडुजी करावी, अशी मागणी रिक्षाचालकांसह सामान्य नागरिक करत आहेत. अन्यथा हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

---

## बाजार समितीच्या विकासासाठी मी सभापती, उपसभापती, संचालकांच्या मागे खंबीरपणे उभा !

### भाजप आमदार किसन कथोरे यांचा सूचक इशारा



**निवडणूक झाल्याने प्रशासकाचा काही संबंध नाही - आ. कथोरे**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एकदा निवडणूक झाल्यावर प्रशासकाचा काही संबंध राहत नाही. आपोआपच अधिकार हे बाजार समितीच्या संचालकांकडे येतात. त्यामुळे प्रशासकाचा दाद देण्याचा प्रश्नच येत नाही. प्रशासक दाद देत नसेल तर सभापती, उपसभापती, संचालक यांच्या मागे किसन कथोरे आहे अशा शब्दात भाजपचे आमदार किसन कथोरे यांनी बाजार समितीच्या प्रशासकाला सूचक इशारा दिला आहे. कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचा भूखंड लक्ष्मी मार्केट व्यापारी संघटनेला दिल्यावर बाजार समितीचे संचालक प्रशासकावर चांगलेच संतापले आहेत. हा भूखंड नियमबाह्य पद्धतीने दिला गेल्याचा आरोप करीत या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे संचालक मंडळ राजीनामा देणार असल्याचा इशारा संचालकांनी दिला होता. तसेच प्रशासकाच्या मनमानी विरोधात बंदचे हत्यार उपसण्यात येईल असाही इसारा देण्यात आला होता. त्या पश्चात सोमवारी भाजप आमदार कथोरे यांनी उपरोक्त इशारा दिला आहे.दरम्यान बाजार समितीच्या आवारात रस्ते आणि भूयारी गटारींची समस्या आहे. तसेच काही विकास कामांचे प्लान आहेत. या सगळ्या विकास कामांचा संयुक्त विकास आराखडा तयार करुन ती कामे मार्गी लावण्यासाठी आमदार कथोरे यांनी कल्याण डोंबिवलीचे आयुक्त अभिनव गोयल यांची भेट घेतली. यावेळी बाजार समितीचे सभापती रविंद्र घोडविंदे, उपसभापती जालिंदर पाटील, संचालक भाऊ गोंधळे आदी उपस्थित होते.कल्याण डोंबिवली महापालिकेतील २७ गावे ही यापूर्वी आमदार कथोरे प्रतिनिधीत्व करीत असलेल्या विधानसभा मतदार संघाशी जोडली गेली होती. त्या वेळेपासून त्यांना या भागातील समस्या माहिती आहे. त्यामुळे त्यांनी २७ गावातील जिल्हा परिषदेच्या शाळा महापालिकेकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात. २७ गावातील अमृत पाणी पुरवठा योजनेचे काम गतीने मार्गी लावावे. तसेच रिंग रोड प्रकल्पातील अडथळे दूर करुन बाधितांचे पुनर्वसन करावे. याशिवाय कल्याण तहसीलदार आणि पंचायत समिती कार्यालयाची इमारत नव्याने तयार करुन त्याठिकाणी प्रशासकीय भवन उभारण्यात येणार आहे. या विविध विषयावर आयुक्त गोयल यांच्याशी सकारात्मक चर्चा करण्यात आली असल्याची माहिती आमदार किसन कथोरे यांनी दिली.

## कोकाटेंच्या वक्तव्याने नव्या वादाला तोंड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शासन शेतकऱ्यांकडून एक रुपया घेते. आम्ही शेतकऱ्याला एक रुपया देत नाही. त्यामुळे शासनच भिकारी आहे. शेतकरी भिकारी नाही. एक रुपया ही किंमत फार थोडी आहे. एक रुपयाच्या विम्यामुळे महाराष्ट्रामध्ये पाच-साडेपाच लाख बोगस अर्ज माझ्याच काळात सापडले. मी ते बोगस अर्ज तत्काळ रद्द केले, असे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले होते. शासन भिकारी आहे, या कोकाटे यांच्या विधानावरून वाद निर्माण होण्याची शक्यता असून, विरोधकांकडून टीका केली जात आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली.

ते काय बोलले, ते मी ऐकलेले नाही. तथापि, जर त्यांनी असे वक्तव्य केले असेल, तर मंत्र्यांनी असे वक्तव्य करणे चुकीचे आहे. पीकविम्याच्या संदर्भात आपण जाणीवपूर्वक निर्णय घेतला आणि त्याची पद्धती बदलली. पीकविम्यात आपल्या लक्षात आले की, पीकविम्यात काही वर्षांमध्ये शेतकऱ्यांना फायदा झाला, तरी बहुतांश वर्षांमध्ये त्याचा अधिक फायदा कंपन्या घेत आहेत. म्हणून त्याची पद्धती बदलली. पण पद्धती बदलत असताना, आपण दुसरा निर्णय हादेखील घेतला की, शेतकऱ्याला मदत तर करूच; पण, त्यासोबतच ५ हजार कोटी रुपये दरवर्षी शेतीमध्ये आपण गुंतवू करू. त्याची सुरुवातही केली आहे. २५ हजार कोटी रुपये ५ वर्षांत शेतीमधील गुंतवणूक आपण वाढवत आहोत. त्यामुळे मला असे वाटते की, अशा प्रकारचे वक्तव्य योग्य नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. ते पत्रकारांशी बोलत होते.










---



## ठाणे मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाच्या समन्वयाने कल्याण येथे सामुदायिक आरोग्य शिबिर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, दि.21 :** ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, स्थानिक नगरसेवक व सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कल्याण येथे दि.20 जुलै रोजी मोफत सामुदायिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य शिबिरास माजी मंत्री तथा आमदार रविंद्र चव्हाण यांची विशेष उपस्थिती लाभली.

या आरोग्य शिबिरात स्थानिक नागरिकांसाठी विविध वैद्यकीय तपासण्या, रक्तदाब, मधुमेह, डोळे तपासणी, स्त्रीरोग व बालरोग तज्ञांच्या सल्ल्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच मोफत औषध वाटप, चष्मे वाटप, अंध काठी वाटप, वृद्धांसाठी चरण सेवा आरोग्य जनजागृतीपर माहिती व मार्गदर्शन देण्यात आले.

आमदार रविंद्र चव्हाण यांनी शिबिरातील वैद्यकीय टीमचे व मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, ठाणे यांचे कौतुक करताना सांगितले की, "सामान्य नागरिकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढते आणि त्याचा थेट लाभ त्यांना मिळतो."

या आरोग्य शिबिरास नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट दिली व वैद्यकीय सुविधांचा लाभ घेतल्या. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी स्थानिक संस्था, स्वयंसेवक, डॉक्टर व प्रशासन यांचे विशेष योगदान लाभले.

## ई-केवायसी न झाल्यास रेशनचे धान्य बंद

### शहापुरातील लाभार्थ्यांना बसणार फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील पात्र प्राधान्य कुटुंब योजना तसेच अंत्योदय अन्न योजनेतील रेशनकार्डमध्ये ऑनलाइन नावनोंदणी असलेल्या सर्व सदस्यांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. असे असताना शहापूर तालुक्यातील ४३ हजार शिधापत्रिकाधारकांनी शिधापत्रिका ई-केवायसी करण्याकडे पाठ फिरवली आहे.

यापूर्वीच सरकारने तीन वेळा मुदतवाढ देऊनही शहापूर तालुक्यातील ४३ हजार लाभार्थ्यांची ई-केवायसी अपूर्ण आहे. त्यांच्यासाठी सरकारकडून आता शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. ३१ जुलैपर्यंत ई-केवायसी न झाल्यास सप्टेंबर महिन्यापासून अशा लाभार्थीचे धान्य बंद होणार आहे.

शहापूर तालुक्यात राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत शिधापत्रिकांवर धान्य लाभघेणाऱ्या लाभार्थीची संख्या २ लाख १८ हजार इतकी आहे. शासनाने मुदतवाढ देऊनही जून अखेर १ लाख ७५ हजार लाभार्थ्यांनी आपली ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेतली आहे. मात्र अद्यापही ४३ हजार लाभार्थ्यांची ई-केवायसी प्रलंबित आहे. त्यांच्यासाठी ३१ जुलैपर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात आली असून या मुदतीत ई-केवायसी न करणाऱ्यांना सप्टेंबर महिन्यापासून रेशनवरील धान्य वितरणाचा लाभ मिळणार नाही अशी माहिती शहापूर तहसील कार्यालयातून देण्यात आली.

> ज्या लाभार्थ्यांनी अजूनही ई-केवायसी केलेली नाही त्यांनी मेरा केवायसी हे ॲप प्ले स्टोअर वरून डाऊनलोड करावे व त्याद्वारे तत्काळ इ - केवायसी पूर्ण करून घ्यावी.
>
> ■ अमृता सुर्यवंशी, पुरवठा निरिक्षक, शहापूर

# गीतासार



**अध्याय १७**

**श्रद्धात्रयविभागयोगः**

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् । ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १७-१४ ॥

देव, ब्राह्मण, गुरू व ज्ञानी यांची पूजा करणे, पावित्र्य, सरळपणा, ब्रह्मचर्य आणि अहिंसा, हे शारीरिक तप म्हटले जाते. ॥ १७-१४ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् । स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १७-१५ ॥

जे दुसऱ्याला न बोचणारे, प्रिय, हितकारक आणि यथार्थ भाषण असते ते, तसेच वेदशास्त्रांचे पठण व परमेश्वराच्या नामजपाचा अभ्यास, हेच वाणीचे तप म्हटले जाते. ॥ १७-१५ ॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः । भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १७-१६ ॥

मनाची प्रसन्नता, शांत भाव, भगवच्चिंतन करण्याचा स्वभाव, मनाचा निग्रह आणि अंतःकरणातील भावांची पूर्ण पवित्रता, हे मनाचे तप म्हटले जाते. ॥ १७-१६ ॥

# उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मुरबाड मध्ये कार्यकर्ता मेळावा संपन्न




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर मुरबाड तालुक्यात सध्या राजकीय पक्षांचे कार्यकर्ते मेळावे व स्नेहभोजनाचे कार्यक्रमाचा सपाटा चालू आहे. भाजपा मा.केंन्दीय मंत्री कपिल पाटील गट, शिवसेना शिंदे गट, माजी आमदार गोटिराम पवार यांचे मेळावे पार पडले आहेत. तर भाजपा महायुतीचा स्नेहभोजन व मेळावा बुधवारी एम.टी.डी.सी सभागृह माळशेज येथे होणार असून त्याची जय्यत तयारी सुरु आहे.

मुरबाड तालुक्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचाही कार्यकर्ता मेळावा माळशेज घाटाच्या पायथ्याशी संपर्कप्रमुख साईनाथ तारे, जिल्हाप्रमुख कल्पेश भोईर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. शिवसेना पक्ष फुटी नंतर पक्षात आलेली मरगळ दुर करून विखुरलेल्या कार्यकर्तांना या मेळाव्या निमित्ताने नवचैतन्य निर्माण झाले असुन तालुक्यात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे, स्व.आनंद दिघे यांना व उद्धव ठाकरे यांना माणनारा एक मोठा वर्ग आहे. धडाडीचे व निष्ठावंत शिवसैनिक संतोष विशे यांच्याकडे तालुका प्रमुख पदी निवड झाल्या नंतर त्यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर दिला असून आजचा हा मेळावा त्यांच्याच आयोजनाखाली पार पडला. यावेळी उपस्थित शिवसैनिकांना जिल्हा उपप्रमुख मधुकर घुडे, महिला जिल्हा संघटक रेखाताई कंटे, लोकसभा सचिव परशुराम पितांबरे, जिल्हा संघटक संतोष शिरोशी, युवा सेना जिल्हाप्रमुख भुषण जाधव, यांनी मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका प्रमुख संतोष विशेष यांनी केले तर सूत्रसंचालन शंकर वडवले यांनी केले. या मेळाव्याला मोठ्या संख्येने महिला व जेष्ठ शिवसैनिक उपस्थित होते.

**नियमित वाचा**
**दैं. ठाणे जीवनदीप वार्ता**

# सायबर गुन्हेगारांचे अदृश्य चेहरे

सध्याचे युग हे सोशल मीडियाचे युग आहे. या युगात सोशल मीडियावर ऍक्टिव्ह राहून आपण किती सोशल आहोत हे दाखवून देण्याची चढाओढ लागलेली असते. त्यातही तरुण वर्ग तर सोशल मीडियाच्या आहारीच गेला आहे. सोशल मीडियावर आपले फॅन फॉलोअर्स कसे वाढतील? आपल्या पोस्टला जास्तीतजास्त लाईक आणि शेअर कसे मिळतील याकडे तरुणांचे लक्ष असते. मात्र काही वेळा हेच जास्त फॅन फॉलोअर्स असलेले अकाउंट सायबर गुन्हेगारांना आकर्षित करतात आणि यांना धोका दिला जातो. सायबर गुन्हेगार ज्यांचे जास्त फॅन फॉलोअर्स असतील अशा तरुणांना स्टार्टअप कंपनी आपल्या प्रोडक्टच्या जाहिराती करण्यासाठी संपर्क करतात त्यातही या सायबर गुन्हेगारांचे लक्ष तरुण मुलींवर अधिक असते. सुंदर आणि जास्त फॅन फॉलोअर्स असणाऱ्या तरुण मुलींना जाळयात ओढण्यासाठी सायबर गुन्हेगार आपण मोठ्या कंपनीतून बोलत असून या मुलींचे



फेसबुक आणि इंस्टाग्रामवरील रिल्स आणि व्हिडिओ पाहून संपर्क केल्याचे सांगतात. मुलींचा व्हिडीओ कंपनीला आवडला असून तुम्हाला आमच्या कंपनीच्या प्रोडक्टसाठी जाहिरात करण्यासाठी निवडले असल्याचे सांगून आणखी व्हिडीओ आणि रिल्स पाठवण्यास सांगतात. बहुतेक वेळा असा संपर्क ईमेल द्वारे केला जातो. मुलीही जणू आपण मॉडेल बनलो आहोत अशा आविर्भात त्यांनी सांगितल्याप्रमाणे व्हिडीओ पाठवतात व इथेच फसतात. व्हिडिओ पाठवल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या मुलींना मेल येतो हा मेल त्यांचाच मॉर्फ केलेला व्हिडिओ असतो. तो व्हिडिओ मॉर्फ करून अश्लील बनवलेला असतो. हा व्हिडीओ पाठवून मुलींना ब्लॅकमेल केले जाते. हे अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन मुलींकडे पैशांची मागणी केली जाते. ज्यांच्याकडे पैसे आहेत त्या मुली पैसे देऊन स्वतःची सुटका करून घेतात मात्र ज्यांना पैसे देणे शक्य होत नाही त्या मुली बदनामीच्या भीतीने स्वतःच आयुष्य संपवून टाकतात . आजवर देशात अनेक मुली या सायबर गुन्हेगारांच्या कारस्थांनाना बळी पडल्या आहेत. विशेष म्हणजे हे ब्लॅकमेलर सायबर गुन्हेगार अदृश्य असल्याने सायबर क्राईमकडे तक्रार करूनही यांचा छडा लागेलच असे नाही. अशा अनेक केसेस पोलिसांच्या सायबर क्राईम सेल कडे दाखल असूनही अनेक गुन्हेगार मोकाट फिरत आहेत. अशा सायबर गुन्हेगारांचा छडा लावणे पोलिसांसाठी डोकेदुखीची बाब बनली आहे. पोलिसांच्या सायबर सेलकडून अशा आमिषाला बळी पडू असे आव्हान केले जातेतरीही अनेक तरुण आमिषाला बळी पडतात. अलीकडे तर हे प्रमाण खूप वाढले आहे त्यामुळे सोशल मीडियावर वावरताना खूप सतर्क राहणे आवश्यक आहे. सायबर गुन्हेगारांची ही टोळी आपली सोशल मीडियामध्ये आपण टाकत असलेल्या पोस्टवरुन आपली मानसिकता ओळखून पद्धतशीरपणे जाळे टाकतात व फसवतात त्यामुळे सोशल मीडियावर पोस्ट टाकताना काळजी घ्यावी. सोशल मीडियावर ओळखीच्याच लोकांना फॉलो करावे. अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. अनोळखी लोकांच्या मेल आणि फोन कॉलला उत्तर देऊ नये. स्वतःच्या कौटुंबिक आणि वैयक्तिक बाबी सोशल मीडियावर टाकू नये. सोशल मीडियावर वावरताना जर सतर्क राहिले नाही तर सायबर गुन्हेगारांचे हे अदृश्य चेहरे आपल्याला घेरण्यास टपून बसलेलेच आहेत याची जाणीव सोशल मीडिया वापरणाऱ्या सर्व तरूणांनी ठेवावी.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# ९/आय प्रभागात अनधिकृत बांधकाम धारकांवर गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकाम निदर्शनास आल्यास त्यांवर प्रभाग क्षेत्राच्या सहा. आयुक्तांना कारवाई करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी यापूर्वीच दिलेले आहेत.



त्या अनुषंगाने 9/आय प्रभागातील साजीद हुसैन यांचे मौजे गोळवली तळ + 2 घराचे अनधिकृत बांधकाम काढून टाकणेबाबत 9/आय प्रभागाचे सहा.आयुक्त भारत पवार यांनी एमआरटीपी अंतर्गत नोटीस बजाविली होती.

तथापि, संबंधितांनी सदरचे बांधकाम काढून न घेतल्याने ते महापालिकेमार्फत अंशतः निष्कासित करण्यात आले होते. परंतू संबंधितांनी सदर बांधकाम पुन्हा चालु केल्यामुळे, संबंधित साजीद हुसैन व इतर 9 बांधकाम धारकांवर 9/आय प्रभागामार्फत मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली (पूर्व) येथे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 52 व 53 प्रमाणे व महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 चे कलम 397 क नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक पोलीस बंदोबस्त घेऊन सदर बांधकाम पूर्णपणे निष्कासित करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याची माहिती सदर प्रभागाचे सहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी दिली आहे.

# ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांसाठी आनंदाची संधी!

## राजर्षी शाहू महाराज मानधन सन्मान योजना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना २०२५-२६ अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांना दरमहा ५,००० रुपये मानधन देण्यात येणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत आपले सरकार पोर्टलवर https://aaplesarkar.mahaonline.gov.in या लिंकमार्फत ऑनलाईन अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा परिषद, ठाणे मार्फत करण्यात येत आहे.

**योजनेसाठी ३१ जुलै २०२५ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन**

पात्रता निकष:

- अर्जदाराचे वय ५० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त असावे
- दिव्यांग व्यक्तींसाठी वयोमर्यादा ४० वर्षे
- कला/साहित्य क्षेत्रातील किमान १५ वर्षे सातत्यपूर्ण व दर्जेदार योगदान असणे आवश्यक
- अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ६०,०००/- रुपयांपेक्षा कमी असावे
- फक्त कलेवर अवलंबून असणारे किंवा सध्या उत्पन्नाचा अन्य स्रोत नसलेले कलाकार
- केंद्र/राज्य शासनाच्या कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत समाविष्ट नसलेले
- अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक
- विधवा, परित्यक्ता, दिव्यांग, वयाने ज्येष्ठ कलाकारांना प्राधान्य

आवश्यक कागदपत्रे:

- वयाचा दाखला
- आधार कार्ड
- रहिवासी दाखला
- उत्पन्नाचा दाखला
- प्रतिज्ञापत्र
- पती-पत्नीचा एकत्रित फोटो (लागू असल्यास)
- बँक पासबुक झेरॉक्स
- अपंगत्वाचा दाखला (लागू असल्यास)
- पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- शिफारसपत्र (नामवंत संस्था/व्यक्तीचे – लागू असल्यास)
- कलात्मक कार्याची विविध साक्षी/पुरावे

ठाणे जिल्ह्यातील पात्र ज्येष्ठ साहित्यिक व कलाकारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी वेळेत अर्ज करावा, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) प्रमोद काळे यांच्यामार्फत करण्यात आले आहे.

# तब्बल १५ वर्षांनंतर माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : बालपणीचे मित्र अनेक वर्षांनी भेटणे हा सुद्धा एक आयुष्यातला दुग्ध शर्करा योग असतो .असा दुग्ध सर्करायोग सोशल मीडिया अन हायटेक प्रणालीमुळे पेण तालुक्यातील रावे माध्यमिक विद्यालयातील पंधरा वर्षांपूर्वीच्या जिवलग मित्र मैत्रिणींनी एकत्र येऊन आनंद द्विगुणीत केला आहे. पेण तालुक्यातील रावे गावातील सुधागड एज्यूकेशन सोसायटी पालीचे सार्वजनिक माध्यमिक विद्यामंदिर येथे इयत्ता दहावी २०१० मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला

शाळेच्या सभागृहात प्रार्थनेने ह्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. मुख्याध्यापक सोपान शेंडगे यांनी दीप प्रज्वलन केले. त्यानंतर विद्येची देवता गणपती, सरस्वती देवी




**आपण शाळेचे काही देणे लागतो या उद्देशाने शाळेतील सध्या शाळेमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत शिकता येईल म्हणून शाळेमध्ये प्रोजेक्टर भेट देण्यात आला**

व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या मूर्तीना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमानिमित्त इयत्ता दहावी २०१० मध्ये शिकलेले ६५ विद्यार्थी सहभागी झाले होते व सगळया विद्यार्थ्यांना ज्या गुरुजनांनी ज्ञानाचे धडे शिकवले ते सर्व शिक्षक कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांकडून सर्व शिक्षकांचा सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देवून सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी आपण शाळेचे काही देणे लागतो या उद्देशाने शाळेतील सध्या शाळेमध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत शिकता येईल म्हणून शाळेमध्ये प्रोजेक्टर भेट देण्यात आला .यावेळी सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले तसेच काही माजी विद्यार्थ्यांनी आपल्या बालमित्रांशी व शिक्षकांशी संवाद साधला .यावेळी शाळेत घडलेले जुने किस्से व काही घटनांना उजाळा देण्यात आला. जमलेल्या मित्र-महिणी मैत्रिणींनी आपापल्या आयुष्यातील चढ-उतार आनंदाचे क्षण एकमेकांना सांगून मनाला उभारी दिली .शाळेतील त्यावेळच्या आठवणी काही मित्र आणि मैत्रिणींना दाटूनही आल्या. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या समवेत स्नेहभोजन केले. विद्यार्थ्यांनी शाळेत असतांना खेळलेले खेळ खेळण्यात आले. साधारण पंधरा वर्षातून सर्व एकत्र आल्यामुळे सर्वांनी या दिवसाचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाची सांगता होताना सर्वांचे डोळे पाण्याने भरून आले सर्वांनी आपल्या बालमित्रांच्या भेटी घेऊन वंदे मातरम गीताने या कार्यक्रमाची सांगता केली.

या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सोपान शेंडगे , स्थानिक शाळा समितीचे सचिव अरुण पाटील, मनोज पाटील,बी.एस.पाटील , एस. के .ठाकूर , एम. टी .पाटील , पी .आर .पाटील , आर .डी .पाटील ,व्ही बी पाटील , व्ही. एस .पाटील, नंदकुमार कुंभार व शाळेतील माजी शिपाई प्रसाद पाटील उपस्थित होते तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी विद्यार्थी विशाल पाटील यांनी केले .हा कार्यक्रम घडून आणण्यासाठी प्रवीण पाटील, प्रकाश पाटील ,सचिन माळी वैभव पाटील ,नितेश पाटील ,दिपू पाटील ,तृप्ती पाटील ,सिमा पाटील ,अश्विनी पाटील ,सुरज पाटील,कल्पिता पाटील या माजी विद्यार्थ्यांनी मोलाचे योगदान दिले.

# आरोग्य

## रिकाम्या पोटी केळी खाता मग हे वाचा



ऊर्जा वाढवते : केळीमध्ये नैसर्गिक साखर, कार्बोहायड्रेट्स आणि फायबर भरपूर प्रमाणात असते, जे शरीराला त्वरित ऊर्जा देते. म्हणून जर तुम्ही व्यायाम करणार असाल किंवा घाईत असाल तर रिकाम्या पोटी केळी खाल्ल्याने तुम्हाला त्वरित ऊर्जा मिळू शकते.

पचनासाठी उपयुक्त: केळीमध्ये असलेले फायबर पचनसंस्था सुधारते. जर तुम्हाला बद्धकोष्ठतेची समस्या असेल तर सकाळी रिकाम्या पोटी केळी खाल्ल्याने आतड्यांसंबंधी हालचाल नियमित होऊ शकते.

वजन कमी करण्यास उपयुक्त : जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर केळी तुमचा साथीदार असू शकते. त्यात जवळजवळ चरबी नसते आणि भूक नियंत्रित करण्यास मदत करते, ज्यामुळे तुम्हाला जास्त खाणे टाळण्यास मदत होते.

हृदयासाठी फायदेशीर : केळी हे पोटॅशियमचा एक उत्तम स्रोत आहे, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदय निरोगी ठेवण्यास मदत करते. सकाळी ते खाल्ल्याने हृदयाला चांगला आधार मिळतो.

रिकाम्या पोटी केळी खाण्याचे तोटे

ॲसिडिटीची समस्या : काही लोक रिकाम्या पोटी केळी खाल्ल्यानंतर पोटात जडपणा किंवा गॅसची तक्रार करतात. केळी शरीरात मॅग्नेशियमचे प्रमाण वाढवते, ज्यामुळे ॲसिड रिफ्लक्स किंवा अपचन होऊ शकते.

रक्तातील साखरेवर परिणाम : केळीमध्ये नैसर्गिक साखर असते. जर तुम्हाला मधुमेह असेल किंवा इन्सुलिन संवेदनशीलता असेल तर रिकाम्या पोटी केळी खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी अचानक वाढू शकते.

चयापचय वर परिणाम : काही पोषण तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की केळी खाल्ल्याने शरीराचा pH असंतुलित होऊ शकतो, ज्याचा चयापचयवर सौम्य परिणाम होऊ शकतो. विशेषतः ज्यांची पचनशक्ती कमकुवत आहे त्यांनी केळी खाण्यापूर्वी फायबर किंवा प्रथिने समृद्ध असलेले काहीतरी हलके खावे.

# जन सुरक्षा विधेयक की जन असुरक्षा विधेयक?

## मुंबईत झाली आक्रमक चर्चा आणि नियोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : नुकताच जन सुरक्षा विधेयक महाराष्ट्राच्या बोकांडी मारल्याने यापुढे सामाजिक चळवळी संपतात की काय, त्या टिकून राहिल्या पाहिजेत. याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी मुंबई येथे मराठी पत्रकार संघ कार्यालयात सभा आयोजित करण्यात आली होती.

काल-परवा राज्याच्या विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये जन सुरक्षा विधेयकावर चर्चा अल्प प्रमाणात झाली आणि विधेयक मंजूरही करण्यात आले. अगदी एक दिवसाच्या आत राज्यपालांची त्यावर सही सुद्धा झाली. सत्तेत असलेल्या काही आमदारांना सुद्धा कदाचित हे विधेयक कळालेलं नसेल. म्हणून विधान भवनात यावर सखोल आणि गंभीर चर्चा झाली नाही. अगदी विरोधकांनाही चर्चा करण्याऐवजी विधान भवन त्याग करावा लागला. परंतु, संघटना व व्यक्ती यांना भविष्यात सरकारच्या विरोधात आंदोलन करता येणार नाही. त्यांना शहरी व ग्रामीण नक्षलवादी ठरवून कोणतीही चौकशी न करता सरसकट तुरुंगात टाकले जाईल. त्यांच्या संपत्तीवर टाच आणली जाईल. त्यांना सहाय्य करणाऱ्या वा मदतीला जाणाऱ्या लोकांना मोठा दंडासह तुरूंगवास देखील होईल. शिवाय याचा दुरुपयोग करून चळवळीत काम करणाऱ्या लोकांना सरळ सरळ संपवलं जाईल. अशा प्रकारचा हे असुरक्षा विधेयक महाराष्ट्राच्या बोकांडी मारलेला आहे. या विरोधातली लढाई प्रत्यक्षात रस्त्यावर उतरून करावी लागेल. असे डॉ. प्रकाशजी आंबेडकर यांनी सांगितले आहे. तर सर्व संघटनांनी वज्रमूठ करून समाजातील तळागाळामध्ये जनजागृती करून या जन असुरक्षित विधेयकाला रद्द करण्यात यश येईपर्यंत शांत बसणार नाही. असा इशारा आमदार कपिल पाटील यांनी दिला आहे. यावेळी अनेक संघटना प्रतिनिधी व राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे कोकण विभाग अध्यक्ष एकनाथ तारमळे, राष्ट्रसेवा दलाचे राजा कांदळकर, शेतकरी संघटनेचे राज पाटील, छात्र भारतीचे रोहित ढाले, अतुल देशमुख, अरुण लावंड, अरविंद सावला, शिवाजी खैरमोडे, रमेश गायकर व अनेक संघटना पदाधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सर्व संघटनांनी वज्रमूठ करून समाजातील तळागाळामध्ये जनजागृती करून या जन असुरक्षित विधेयकाला रद्द करण्यात यश येईपर्यंत शांत बसणार नाही. असा इशारा आमदार कपिल पाटील यांनी दिला आहे.**




**मेष**

तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल.

**वृषभ**

व्यवसायात फायदा होईल.दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे. व्यवसायात नफा मिळविण्यासाठी कोणाची तरी मदत घ्यावी लागेल.

**मिथुन**

व्यावसायिक बाबतीत आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतील. विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील.

**कर्क**

आज तुम्हाला नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल. तुमच्या

**सिंह**

काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी सहकाऱ्यांची मदत मिळेल.

**कन्या**

तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल जेणेकरून तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर मानसिक शांती मिळेल.

**तूळ**

जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते. कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. काही काम करण्याच्या नवीन पद्धतीचा विचार कराल.

**वृश्चिक**

कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे.

**धनु**

विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाईल.व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल महत्त्वाच्या व्यक्तीशी राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**मकर**

कामाच्या ठिकाणी काम चांगले होईल. काही कामात मदत लागेल, या बाबतीत एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची कामे पूर्ण करता येतील.

**कुंभ**

काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. विद्यार्थ्यांना स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते.

**मीन**

आर्थिक लाभाचे नवीन स्रोत दिसू शकतात. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो. तुम्ही अशा व्यक्तीला भेटू शकता जो तुम्हाला भविष्यात खूप फायदे देऊ शकेल.






# उच्च न्यायालयाला मिळाले दोन नवे न्यायमूर्ती


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, ता. २१ :** उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून न्या. चंद्रशेखर आणि न्या. सुमन श्याम यांनी सोमवारी (ता.२१) शपथ घेतली. त्यामुळे आता मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींची संख्या ६६ वर पोहोचली आहे.

न्या. चंद्रशेखर यांची राजस्थान उच्च न्यायालयातून तर न्या. श्याम यांची गुवाहाटी उच्च न्यायालयातून बदली झाली आहे. विशेष म्हणजे, न्या. चंद्रशेखर हे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या नंतर उच्च न्यायालयाचे सर्वात वरिष्ठ न्यायमूर्ती बनले आहेत. ते उच्च न्यायालयाच्या पाच सर्वोच्च न्यायमूर्तींपैकी एक असणार आहेत. त्यांचा जन्म २५ मे १९६५ रोजी झाला. त्यांनी १९९३ मध्ये दिल्ली विद्यापीठाच्या कॅम्पस लॉ सेंटरमधून एलएलबी अभ्यासक्रम पूर्ण केला आणि ९ डिसेंबर १९९३ रोजी दिल्ली बार कौन्सिलमध्ये वकील म्हणून नोंदणी केली. ७ ऑक्टोबर २०१३ रोजी त्यांची झारखंड उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली आणि ७ जून २०१४ रोजी त्यांना कायमस्वरूपी करण्यात आले. त्यानंतर त्यांची राजस्थान उच्च न्यायालयात बदली झाली. तर न्या. शाम यांनी ३ सप्टेंबर १९९६ रोजी बार कौन्सिल ऑफ आसाम अंतर्गत वकील म्हणून नोंदणी केली. त्यांनी उच्च न्यायालयात निवडणूक खटले तसेच फौजदारी प्रकरणे हाताळली आहेत.

# वसईच्या समुद्र किनारी आढळला अज्ञात कंटेनर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**वसई:-** वसई पश्चिमेच्या कळंब समुद्र किनारी एक मोठा कंटेनर आढळून आला आहे. मंगळवारी सकाळी प्रभात फेरीसाठी गेलेल्या नागरिकांना हा कंटनेर दिसून आल्याने हा प्रकार उघड झाला आहे. पोलिसांकडून याचा तपास सुरू करण्यात आला आहे. वसई पश्चिमेच्या भागात कळंब समुद्रकिनारा आहे. या समुद्रकिनाऱ्यावर मोठ्या संख्येने पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. मंगळवारी सकाळी या समुद्रकिनाऱ्यावर एक मोठा कंटनेर वाहून आल्याचे नागरिकांना दिसून आले आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली. नागरिकांनी याची माहिती तात्काळ नालासोपारा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कंटेनर बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

# कल्याण शहरातील वाहतूक कोंडीवर मनसे आक्रमक

## प्रश्न न सुटल्यास रास्ता रोकोचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** शहरात अनेक दिवसांपासून दररोज सकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत सर्व चौक तसेच विविध मार्गावर वाहतूक कोंडी झालेली असते. तरीही वाहतूक विभागाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत असल्याचे दिसत नाही. वाहतूक विभागाच्या दुर्लक्षामुळे काही नागरिकांना आपले जीव देखील गमवावे लागले आहेत. त्यामुळे कल्याण शहरातील वाहतूक समस्या त्वरित न सुटल्यास नागरिकांसोबत रस्त्यावर उतरून रास्ता रोको करण्याचा इशारा मनसेच्या वतीने वाहतूक विभागाला निवेदनातून देण्यात आला आहे.

कल्याण शहरात सहजानंद चौक येथे सहा रस्ते एकत्र येत असताना वाहतूक नियंत्रण कश्या प्रकारे असावे याबाबत आतापर्यंत कोणती उपाययोजना केली, त्यासोबतच अवजड वाहनांना दिवसभरासाठी बंदी का केली जात नाही, असे सवाल मनसेने निवेदनातुन केले आहेत. रामदेव हॉटेलचे पार्किंग तसेच खाजगी ट्रॅव्हल्सच्या बसेस मुख्य चौकात प्रवासी घेण्याकरीता उभ्या असतात त्याबाबत त्वरीत कारवाई व्हावी.

कल्याण शहरात सहजानंद चौक येथे सहा रस्ते एकत्र येत असताना वाहतूक नियंत्रण कश्या प्रकारे असावे याबाबत आतापर्यंत कोणती उपाययोजना केली, त्यासोबतच अवजड वाहनांना दिवसभरासाठी बंदी का केली जात नाही, असे सवाल मनसेने निवेदनातुन केले आहेत. रामदेव हॉटेलचे पार्किंग तसेच खाजगी ट्रॅव्हल्सच्या बसेस मुख्य चौकात प्रवासी घेण्याकरीता उभ्या असतात त्याबाबत त्वरीत कारवाई व्हावी. तसेच या चौकात सिसिटिवी कॅमेरा असून सुध्दा वाहतूक नियंत्रण संदर्भात काय उपाययोजना होते, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्टेशन परिसरात होणारी वाहतूक समस्या, आग्रा रोड दक्षिण मुखी मारुती मंदिर चौकात अपघात होऊन सुध्दा वाहतूक नियंत्रक दिवसभरासाठी उपलब्ध नसतो असेही निवेदनात नमूद केले आहे.



# महिला रिशेप्शनिस्टला शिवीगाळ करत परप्रांतीय तरुणाची लाथा बुक्क्यांनी मारहाण

## पिसावलीतील खाजगी रुग्णालयात धक्कादायक प्रकार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली, ता. 22 -** नांदिवली येथील श्री बालचिकित्सा क्लिनिक मध्ये डॉक्टरांच्या केबिनमध्ये घूसणाऱ्या व्यक्तीला आत जाऊ नका, आत लोक आहेत असे सांगताच त्या व्यक्तीने 25 वर्षीय तरुणीला बेदम मारहाण केल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली.

सोनाली कळासरे असे मारहाण झालेल्या तरुणीचे नाव असून गोकुळ झा असे मारहाण करणाऱ्या परप्रांतीय तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी पीडित तरुणीने मानपाडा पोलीस ठाण्यात गोकुळ झा याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस याप्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

कल्याण मधील पिसवली गावात पीडित तरुणी सोनाली कळासर ही राहण्यास आहे. नांदिवली येथील डॉ. अनिकेत पालांडे यांच्या श्री बालचिकीत्सालय क्लिनिकमध्ये ती रिसेप्शनिस्ट म्हणून काम करते. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार सकाळी 10 ते दुपारी 2 व संध्याकाळी 6 ते 10 अशा दोन शिफ्टमध्ये ती काम करते. सोमवारी संध्याकाळी 6 च्या सुमारास ती कामावर गेली. त्यावेळी क्लीनिक मध्ये डॉक्टर आलेले नव्हते, तसेच क्लीनिकमध्ये 4 ते 5 पेशंट डॉक्टरची वाट बघत बसले होते. संध्याकाळी 6.35 वा डॉक्टर क्लीनिकमध्ये आले. त्यावेळी काही एमआर लोक डॉक्टरला भेटण्यासाठी गेले.

कल्याण मधील पिसवली गावात पीडित तरुणी सोनाली कळासर ही राहण्यास आहे. नांदिवली येथील डॉ. अनिकेत पालांडे यांच्या श्री बालचिकीत्सालय क्लिनिकमध्ये ती रिसेप्शनिस्ट म्हणून काम करते. पीडित तरुणीने दिलेल्या तक्रारीनुसार सकाळी 10 ते दुपारी 2 व संध्याकाळी 6 ते 10 अशा दोन शिफ्टमध्ये ती काम करते.

सोमवारी संध्याकाळी 6 च्या सुमारास ती कामावर गेली. त्यावेळी क्लीनिक मध्ये डॉक्टर आलेले नव्हते, तसेच क्लीनिकमध्ये 4 ते 5 पेशंट डॉक्टरची वाट बघत बसले होते. संध्याकाळी 6.35 वा डॉक्टर क्लीनिकमध्ये आले. त्यावेळी काही एमआर लोक डॉक्टरला भेटण्यासाठी गेले.

दरम्यान, एक महिला व पुरुष त्यांच्या बाळाला तपासणीसाठी घेऊन क्लिनिक मध्ये आलेले होते. त्यांच्यासोबत एक 25 वर्षीय मुलगा जो त्यांचा नातेवाईक होता. तो मुलगा आत आला व सरळ डॉक्टरांच्या केबिन मध्ये घुसायला लागला. त्यावेळी सोनाली हिने डॉ. बिझी आहेत तुम्ही जरा वेळ वाट पहा सांगितलं. त्यावेळी त्याने सोनाली हिला शिवीगाळ करत आत कोण बसले आहे त्यांना बाहेर बोलावं, आम्हाला आत जायचे आहे सांगितलं. यावर सोनाली हिने शिवीगाळ करू नका असे सांगितलं. तो त्यावेळी बाहेर गेला परत आत येऊन त्याने सोनाली हिला शिवीगाळ करत स्त्री मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करून लाथा बुक्क्यानी बेदम मारहाण केली.

क्लिनिकमध्ये इतर लोकांनी मुलीची सुटका केली. त्यावेळी डॉक्टर देखील बाहेर आले व त्यांनी भांडण मिटवले. डॉक्टरांनी रुग्ण बाळाच्या आई-वडिलांकडे चौकशी केल्या असता गोकुळ हा त्यांचा नातेवाईक असल्याचे समजले. पीडित तरुणी सोनाली हिने या प्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गोकुळ झा यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. असून दाखल तक्रारीनुसार पोलिसांनी गुन्हा दाखल करत या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे पुन्हा एकदा परप्रांतीयांकडून मराठी माणसांना मारहाण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

# रायगड जिल्ह्यात शिवभोजन थाळीला उतरती काळा केंद्रचालकांचा योजनेतून काढता पाय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता




**अलिबाग, ता. २२ :** शिवसेना ठाकरे सरकारने २०२० मध्ये सुरू केलेल्या शिवभोजन योजनेला अखेरची घरघर लागली आहे. कोरोना काळात गोरगरीब कामगारांना कमी किमतीमध्ये अन्न मिळावे म्हणून या योजनेला प्रोत्साहन देण्यात आले होते.

जिल्ह्यात ३०० हून अधिक शिवभोजन केंद्रे त्या वेळी अस्तित्वात होती, यातील फक्त ७२ केंद्रे सुरू असल्याची माहिती पुरवठा विभागातून देण्यात येते. यातीलही अनेक केंद्रांचा शोध घेऊनही सापडत नाहीत. यामुळे ही योजनाच वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. गतवर्षी संपूर्ण राज्यासाठी २७४ कोटींचा निधी या योजनेसाठी देण्यात आला होता, यंदा फक्त ७० कोटी रुपये देण्यात आले आहेत. यामुळे अनुदान मिळत नसल्याने बहुतांश केंद्रचालकांनी शिवभोजन योजनेतून काढता पाय घेतला आहे. यातील फारच थोडा निधी रायगड जिल्ह्याच्या वाट्याला आला आहे. वेळेत अनुदान मिळत नसल्याचे शिवभोजन केंद्रचालकांचे म्हणणे आहे.

राज्यातील गरीब आणि कष्टकरी लोकांना पोटभर आणि चांगले जेवण मिळावे यासाठी २०२० मध्ये १० शिवभोजन थाळी योजना सुरू केली. याचा सर्वात जास्त फायदा कोरोना कालावधीत झाला. लॉकडाऊनमध्ये सर्व काही बंद असताना कष्टकरी जनतेकडून शिवभोजन केंद्रातील जेवणासाठी मागणी वाढली होती. त्यामुळे तत्कालीन सरकारने जिल्ह्यात ३०० हून अधिक शिवभोजन केंद्रे सुरू केले होती. यातील जेमतेम ७२ केंद्रे सुरू असून, तीदेखील टप्प्याटप्प्याने बंद पडत आहेत.

**“ शिवभोजन योजनेतून जिल्ह्याकरिता दरदिवसासाठी आठ हजार ७५० थाळ्या मंजूर आहेत. १० रुपयात जेवण देण्याची ही योजना होती. शहरी भागासाठी सरकारकडून ४० रुपये, तर २५ रुपये ग्रामीण भागातील केंद्रांना सरकारकडून अनुदान दिले जात होते. सद्य:स्थितीत निधी उपलब्ध होत नसल्याने हे अनुदान देण्यात अडचणी येत आहेत.**

**● सर्जेराव सोनावणे, जिल्हा पुरवठा अधिकारी**



# बदलापूरात महानगर गॅसकडून नागरिकांच्या जीवाशी खेळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर ।** बदलापूरमध्ये अनेक ठिकाणी महानगर गॅस लिमिटेडच्या पाईपलाईनचे कामे पूर्ण झालेले आहे. मात्र रस्त्याच्या बाजूला खोदलेल्या साईटपट्टीवरील खड्डे अजूनही भरले नाहीत. बदलापूर पश्चिमेकडील रमेशवाडी ते बदलापूर गावाकडे जाणाऱ्या कॉंक्रिट रस्त्याच्या साईटपट्टीवरील खड्डे भरले नाहीत.

**गॅस पाईपलाईनचे कामे पूर्ण; मात्र खड्डे अजूनही भरले नसल्याने अपघात होण्याची शक्यता**

पावसाळ्यात रस्त्याच्या साईड पट्टीला मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. या खड्डयांमध्ये पावसाचे पाणी साचत असून त्याला गटाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे सिमेंट कॉंक्रीट रस्ता आणि साईड पट्टी यामध्ये एक ते दीड फुटापेक्षा जास्त खोल खड्डे निर्माण झाले आहेत. त्यामुळे रस्त्याच्या कडेला गाडी उतरवणे कठीण झाले आहेत. हा रस्ता वर्दळीचा अचानक समोरून भरघाव येणाऱ्या वाहनांपासून आपला बचाव करण्यासाठी रस्त्याच्या कडेला साईट पट्टीवर गाडी उतरवणे गरजेचे असते. परंतु त्यामुळे अपघात होत आहेत. दुचाकीस्वारांना त्याचा मोठा फटका बसत आहे.

# डोंबिवलीतील ज्येष्ठ डॉक्टर श्रीराम कुलकर्णी यांचे निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शरद शहाणे

**डोंबिवली -** रुग्ण सेवेबरोबर ज्ञानदान, सामाजिक कार्यात अखंडपणे कार्यरत असलेले डोंबिवलीतील ज्येष्ठ डॉक्टर श्रीराम कुलकर्णी यांचे सोमवारी राहत्या घरी वृध्दापकाळाने निधन झाले. ते ८९ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात मुलगा डॉ. अमित कुलकर्णी, सून डॉ. उज्वला, विवाहित कन्या, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

रुग्णसेवा ही ईश्वर सेवा या भावनेतून डॉ. श्रीराम कुलकर्णी मागील साठ वर्ष डोंबिवलीत रुग्ण सेवा केली. १९ एप्रिल १९३७ मध्ये डॉ. कुलकर्णी यांचा पंढरपूर येथे जन्म झाला. शिक्षणानंतर व्यवसायाच्या निमित्ताने त्यांचे कुटुंब डोंबिवलीत स्थायिक झाले. वैद्यकीय व्यवसायातील असुनही डॉ. कुलकर्णी नित्यनियमाने ज्ञानेश्वरीचे पारायण करत होते. ज्ञानेश्वरातील वचनाप्रमाणे ते जीवनाची वाटचाल करत होते.

# जिल्हा परिषदेकडून होणार ग्रामपंचायतींची झाडाझडती

## मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचा निर्णय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २२ :** जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा विकास करण्याची जबाबदारी व तेथील नागरिकांना सोयीसुविधा पुरविण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर आहे; मात्र अनेकदा ग्रामपंचायती त्यांचे दफ्तर परिपूर्ण न ठेवणे, योजनांची अंमलबजावणी न करणे आदी त्रुटी आढळून येतात. गावपातळीवरील नागरिकांना योजनांपासून व सुविधांपासून वंचित राहावे लागत असल्याची गंभीर बाब आता समोर आली आहे. याची दाखल घेत, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामपंचायतींची झाडाझडती घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या असून या तपासणीत त्रुटी आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गुरुवारी दौऱ्यादरम्यान, अचानक काही ग्रामपंचायतींना भेट दिली. त्या वेळी तपासणी करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींमध्ये गंभीर त्रुटी आढळल्या. याची गंभीर दखल घेत १५० दिवसांची कार्यालयीन विशेष मोहीमअंतर्गत ग्रामपंचायतींची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तपासणी मोहिमेसंदर्भात कोणतीही चालढकल करू नये, तसेच तपासणीच्या दिवशी ग्रामपंचायतींचे अभिलेखे तपासनीस उपलब्ध करून दिले नाही. तपासणीत त्रुटी आढळून आल्यास संबंधितांवर योग्य ती कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

### 1 पंधरा दिवसांत द्यावा लागणार अहवाल !

कोणत्या ग्रामपंचायती तपासणी कार्यक्रम जोडला असून प्रस्तावित तपासणी त्यांना नेमून दिलेल्या ग्रामपंचायतींची तपासणी संबंधित करतील. सर्व अधिकारी यांनी प्रमाणपत्रात नमूद ग्रामा ग्रामपंचायतींची सखोल तपासणी करून आवश्यक त्या शिफारशींसह अहवाल तयार करून १५ दिवसांच्या आत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे सादर करावा लागणार आहे.

### 2 कोण करणार तपासणी ?

मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, सर्व विस्तार अधिकारी (पं.) यांचे पथक असणार आहे.

### 3 ठाणे जिल्ह्यातही होणार तपासणी

ग्रामपंचायतींचे आर्थिक व प्रशासकीय काम पूर्ण करून घेणे, त्याची कार्यवाही करणे, योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे की नाही, याची तपासणी मोहीम 28 जुलै ते 11 ऑगस्ट या कालावधीमध्ये ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर पंचायत समितीच्या अंतर्गत सर्व ग्रामपंचायतींची तपासणी करण्यात येणार आहे.

**ग्रामसेवकांवर होणार कडक कारवाई**

स्थानिक पातळीवर गावांचा विकास व्हावा, यासाठी राज्य व केंद्र सरकारकडून मिळणारा निधी आता थेट ग्रामपंचायतींच्या खात्यावर वर्ग केला जात आहे. या निधीतून गावांचा विकास करण्यात येत असतो. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर सरपंच आणि ग्रामसेवक बैठक घेऊन ठरावदेखील करण्यात येत असतात, असे असतानादेखील अनेक गावांत ग्रामसेवक हजर राहत नसल्याच्या तक्रारी सातत्याने वाढत असल्याने त्याचा परिणाम विकासकामांवर होत आहे. त्यामुळे ग्रामसेवकांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.



# बांधकामांचा राडारोडा टाकून कांदळवन - खाडीत भराव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २० :** ठाण्यात कांदळवन क्षेत्र असलेल्या नऊ ठिकाणी भराव टाकून मोठ्या प्रमाणात इमारती बांधल्याचे प्रकरण विधानसभेत गाजले होते. आता संवेदनशील असलेल्या दिवा, कशेळी, अंजूर, खारीगाव अशा ठिकाणी शेकडो टन बांधकामांचा राडारोडा टाकला जात असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. पर्यावरण संवर्धनासाठी काम करणाऱ्या वनशक्ती संघटनेने हे वास्तव समोर आणले आहे. यासंदर्भात संघटनेने राज्य सरकार, पर्यावरण विभाग, हरित लवादा, वन विभागाला पत्र पाठवून तक्रार नोंदवली आहे.

ठाणे जिल्ह्यातील खाडीकिनाऱ्यावर एक हजार ६०८ हेक्टर इतके कांदळवन आहे. यामध्ये ठाणे, नवी मुंबई, भिवंडी, दिवा, कळवा आणि मुंब्रा या ठिकाणच्या खाडीकिनाऱ्यांचा समावेश होतो. त्सुनामीसारख्या प्रलयाला रोखण्याची ताकद असलेली कांदळवने म्हणजे शहराची नुसती फुप्फुसे नसून ती संरक्षक भिंत म्हणून काम करीत असते. असे असतानाही कांदळवनांची कत्तल करून मोठ्या प्रमाणात भराव टाकला जात आहे.

# मोहोने - एनआरसी परिसरात बिबट्या सदृश्य वन्यप्राण्याचा वावर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण ।** मोहोने गावातील एनआरसी परिसरात बिबट्या सारखा वन्यप्राणी फिरताना आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना अदानी कंपनीच्या सुरक्षारक्षकांच्या निदर्शनास आली आहे. रात्री गस्त घालताना जंगलाच्या सीमेलगत बिबट्या सदृश्य प्राण्याला पाहिल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेनंतर नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. एनआरसी परिसर हा वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक वावराचा भाग असल्याने यापूर्वीही येथे प्राणीदर्शनाच्या घटना घडल्या आहेत. मात्र यावेळी बिबट्यासारखा प्राणी थेट वस्तीच्या आसपास दिसल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे वनविभागाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणीही होत आहे. यासंदर्भात कल्याण वनविभागाचे अधिकारी निलेश आखाडे यांनी सांगितले की, घटनेची माहिती मिळताच संबंधित बीटचे कर्मचारी सानप, भाऊसाहेब आणि इतरांसह घटनास्थळी पाठवण्यात आले असून, स्थानिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



# केडीएमसी आरोग्य विभागातर्फे विविध राष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार विविध आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यात येतात.

आता महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतुन राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम व राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रम यांच्या प्रभावी अंमल बजावणी करिता महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रामध्ये सप्ताहातील एक दिवस साजरा करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत प्रत्येक आठवड्यामध्ये बुधवारी दुपारी 2.00 त 4.00 या वेळात नागरी आरोग्य केंद्रांमध्ये मनशक्ती क्लिनिक सुरु करण्यात येत आहे. सदर क्लिनिकमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत मानसिक आजारांचे लवकर निदान करणे शक्य होईल व रुग्णाला उपचाराची आवश्यकता असल्यास महानगरपालिकेच्या बाई रुक्मीणीबाई व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय या दोन रुग्णालयामध्ये संदर्भित करुन मानसोपचार तज्ञांव्दारे उपचार सुरु करता येईल. तसेच मानसिक आरोग्या विषयी जनजागृती करण्यात येईल. या दरम्यान मानसिक आजारासाठी समुपदेशन करण्यात येईल. राष्ट्रीय अंधत्व निवारण कार्यक्रमाअंतर्गत नागरी आरोग्य केंद्रांमध्ये प्रत्येक आठवड्याला मंगळवारी दुपारी 2.00 त 4.00 या वेळात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी रुग्णांचे स्क्रिनिंग करण्यात येणार आहे. सदर तपासणीअंती मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांना शास्त्रीनगर सामान्य रुग्णालय, डोंबिवली व बाई रुक्मीणीबाई रुग्णालय, कल्याण येथे संदर्भित करुन मोफत शस्त्रक्रिया करण्यात येईल. सदर कार्यक्रमामुळे अंधत्वाचे प्रमाण कमी होईल तसेच दृष्टी संरक्षण व अंधत्व निवारण कार्यक्रमाबाबत जनजागृती करण्यात येईल. तरी, “मानसिक आजाराचे वेळेवर निदान करा व त्यातुन मुक्त व्हा” तसेच “डोळ्यांची काळजी घ्या, मोतीबिंदू पासून वाचा" असे आवाहन महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत करण्यात येत आहे.

# सावकारी कायद्या अंतर्गत पेणमध्ये पितापुत्रांवर गुन्हा दाखल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण येथील सावकार सुरेश उर्फ सूर्यकांत पाटील व त्याचा मुलगा भरत पाटील यांचा सावकारकीचा जाच अनेक वर्ष पेणच्या जनतेमध्ये सुरू होता. लोकांना काही रक्कम देऊन त्याबदल्यात अवाजवी व्याज ह्या सावकारांकडून बळजबरीने वसूल केला जात होता. अखेर ह्या दोन्ही सावकारांच्या जाचाला कंटाळून पेण मधील दोन तरुणांनी दिलेल्या तक्रारीवरून स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग अलिबाग व सहाय्यक निबंधक पेण यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत सावकारांच्या घरी, हॉटेल रायगड गोमांतक व कार्यालयात शुक्रवारी मोठं घबाड पकडले होते. त्यानुसार सहाय्यक निबंधक पेण यांनी यांच्या विरोधात पेण पोलीस स्टेशन मध्ये सावकारी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेची मिळालेली सविस्तर माहिती अशी की, पेण येथील सावकार सुरेश उर्फ सूर्यकांत पाटील व त्याचा मुलगा भरत पाटील यांच्या सावकारकीच्या जाचाला कंटाळून पेण येथील दोन तरुणांनी रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्याकडे लेखी तक्रार केल्या होत्या. त्यानुसार रायगड पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व जिल्हा उप निबंधक यांना संयुक्त कारवाईचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने शुक्रवारी(ता.१९)स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग अलिबाग व सहाय्यक निबंधक पेण यांच्या संयुक्त पथकाने पेण शहरातील चिंचपाडा येथील आमंत्रण बिल्डिंग मधील फ्लॅट नंबर ३०१, ३०२ तसेच हॉटेल रायगड गोमांतक येथे व कार्यालयात छापेमारी केली होती.

या छापेमारी मध्ये सावकारी कायद्याच्या अनुषंगाने विविध बँकांचे रक्कमेचे कोरे चेक, विविध मालमत्तांचे करारनामे, वचन चिठ्ठया, स्टॅम्प पेपर, साठे करार, पासबुक, मालमत्तेचे खरेदीखत, गाव नकाशा, सावकारी पावती बुक, सावकारी प्रॉमिसरी नोटबुक, कर्जाची खतावणी बुके असा दस्तऐवज या पथकाला मिळून आला होता. त्यानुसार सहाय्यक निबंधक पेण सुभाष काळे यांनी सावकारांच्या विरोधात सोमवारी रात्री उशिरा पेण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे.

आरोपीनी अटी व शर्तीचा भंग करून कार्यक्षेत्राच्या बाहेर सावकारी व्यवहार व व्यवसाय करताना मिळून आले. तसेच नियम बाह्य रित्या आवाजवी मोठ्या व्याजाची आकारणी करून लोकांची आर्थिक पिळवणूक करून सावकारी अधिनियम २०१४ मधील कायद्याचे उल्लंघन केले आहे. यांचे विरोधात पेण पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा रजि. नंबर १३४/२०२५ सावकारी अधिनियम २०१४ चे कलम २३, ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४६, ४८ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या आदेशानुसार पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करण्यात येत आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांचा कल्याण तालुका दौरा



संगणक व टॅबचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जिल्हाधिकारी ठाणे श्री. अशोक शिनगारे यांनी आज दि. २२/०७/२०२५ रोजी कल्याण तालुक्याचा दौरा केला. त्यावेळी उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमात आय.डी.बी.आय. बँक लिमिटेड यांचे सी.एस.आर. निधीतून कल्याण तालुक्यातील काही शाळांना व शासकीय रुग्णालयांना संगणक, प्रिंटर्स व टॅब्सचे वाटप करण्यात आले. बँकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. उपविभागीय अधिकारी कल्याण कार्यालयाचे केलेल्या नुतनीकरणाची त्यांनी पाहणी करुन समाधान व्यक्त केले. तसेच कार्यालयीन अधिकारी-कर्मचारी यांच्या कामाबाबत समाधान व्यक्त करुन निरंतरपणे लोकहितार्थ सेवा देण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपण देखील करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी श्री. हरिष पाटील, पोलीस उपायुक्त श्री. अतुल झेंडे, उपविभागीय अधिकारी श्री. विश्वास गुजर, आय.डी.बी.आय. बँकेचे मुख्य व्यवस्थापक श्री. रंजनकुमार रथ, ठाणे विभाग व्यवस्थापक श्री. रंजन कन्हैया तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांनी कल्याण तहसिल कार्यालयास देखील भेट दिली.


## जिल्हा परिषद ठाणे
## ग्रामपंचायत विभाग

**कार्यालयाचा पत्ता : स्क्वेअर फिट होम्स, दुसरा माळा, प्लॉट न. १०६/१०७ एस जी बर्वे रोड, GST भवन समोर, वागळे इस्टेट, २२ नंबर सर्कल, ठाणे ४००६०१**

**दु.क्र. : ०२२-२०८१२९१६** E Mail: vpzpthane@gmail.com

ज्येष्ठ साहित्यिक, कलाकारांनी मानधनसाठी दिनांक- ३१/०७/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करा

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत यांना मानधन सन्मान योजना २०२५-२६ अंतर्गत कला व साहित्य क्षेत्रातील योगदान दिलेल्या मान्यवर ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार यांना प्रतिमहा ५ हजार रुपये मानधन देण्यात येते. योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी आपले सरकार पोर्टलवर माहे ३१ जुलै, २०२५ अखेरपर्यंत आपले सरकार पोर्टलवर https://aaplesarkar.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज भरावा, असे आवाहन उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत विभाग यांचेमार्फत करण्यात येत आहे.

या योजनेची लाभार्थ्यांची पात्रता ज्यांचे वय ५० पेक्षा जास्त आहे. दिव्यांगांना वयाची अट १० वर्षांने शिथिल करण्यात येत आहे. (दिव्यांगांना वयोमर्यादा ४० वर्षे), ज्यांचे कला व साहित्य क्षेत्रातील योगदान कमीत कमी १५ वर्षे आहे. ज्यांनी साहित्य व कलाक्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व मोलाची भर घातली आहे. वयाने ज्येष्ठ असणारे, विधवा, परित्यक्ता, दिव्यांग कलाकार यांना प्राधान्य राहील. कलाकारांचे वार्षिक उत्पन्न ६० हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे. ज्या कलाकारांची उपजीविका फक्त कलेवरच अवलंबून आहे असे कलाकार तसेच जे कलाकार फक्त कलेवरच अवलंबून होते, मात्र सध्या त्यांना इतर कोणत्याही मार्गाने उत्पन्न नाही असे कलाकार, केंद्र किंवा राज्य शासनाच्या महामंडळे इतर कोणत्याही नियमित मासिक पेन्शन योजनेत अंतर्भूत नसलेले पात्र कलाकार, कलाकार/साहित्यिक महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे.

आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे आहे.

वयाचा दाखला, आधारकार्ड, उत्पन्नाचा दाखला. रहिवासी दाखला, प्रतिज्ञापत्र, पती व पत्नी एकत्रित फोटो (लागू असल्यास), बँक पासबुक, अपंगत्व दाखला (लागू असल्यास), राज्य केंद्र सरकारचे पुरस्कार प्रमाणपत्र (लागू असल्यास), नामांकीत संस्था, व्यक्ती यांचे शिफारस पत्र (लागू असल्यास), विविध पुरावे.

**सही /-**
**(प्रमोद काळे)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद ठाणे**

**जा.क्र.ठाजिप/ग्रापं/प्रशा ३/२३९२/२०२५**
**दिनांक :- २१/०७/२०२५**


# राज्य कंत्राटदार महासंघाचा जिल्हाधिकारी कार्यालय येथे धडक मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : जिल्ह्यातील कंत्राटदारांनी विविध योजनेंतर्गत केलेल्या कामांची देयके अद्याप मिळालेली नसून हि देयके तत्काळ अदा करावित या मागणीसाठी राज्य कंत्राटदार महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता.

राज्य शासनाच्या विविध योजनेंतर्गत राज्यातील कंत्राटदार कामे करीत असतात. मात्र, त्यांची सुमारे 90 हजार कोटी रूपयांची देयके रखडली आहेत. ही देयके अदा करण्यासाठी राज्य कंत्राटदार महासंघाचा संघर्ष सुरू आहे. आता या देयकांमध्ये जल जीवन मिशनच्या देयकांचाही समावेश झाला आहे. ही देयके तत्काळ देण्यात यावीत, यासाठी हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी मोर्चेकऱ्यांनी शासनाचा निषेध केला. तसेच, हातात फलक घेऊन शेतकऱ्यांप्रमाणे आम्हीही आत्महत्या करायच्या का? असा सवाल उपस्थित महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. तर गेल्या दोन वर्षांपासून संघर्ष करीत आहोत. तरीही आमची 90 हजार कोटी रूपयांची देयके अदा करण्यात आलेली नाहीत तसेच ठाणे जिल्ह्यात जलजीवन योजनेंतर्गत 740 कामे करण्यात आली. 740 गावांतील घराघरात कंत्राटदारांनी पाणी पोहचविले आहे. मात्र देयके बाबत राज्य व केंद्र सरकारकडून विचारविनिमय होत नसल्याने अनेकदा निवेदने दिली आहेत. मात्र, त्यावर काहीच कार्यवाही होत नाही. त्यामुळेच आम्ही रस्त्यावर उतरलो असल्याचे राज्य कंत्राटदार महासंघाचे ठाणे जिल्हाध्यक्ष मंगेश आवळे यांनी म्हटले आहे.

याआंदोलनावेळी संघटनेचे पदाधिकारी व कंत्राटदार भगवान भोईर, कल्पेश केणी, पिन पाटील, आकाश आव्हाड, अनंता पवार, अनिकेत धलपे, कौस्तुभ राणे, काशिनाथ मुरबाडे, विक्रांत देशमुख, राणा ढोले, अनिल नलावडे, चेतन शिंदे अविनाश तिवरेकर आदी पदाधिकारी व कंत्राटदार सहभागी झाले होते.

# राष्ट्रवादीच्या कार्याध्यक्ष पदी अरुण मांजे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जेष्ठ नेते स्व.दशरथ तिवरे यांचे कट्टर समर्थक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते असलेले अरुण मांजे यांची राष्ट्रवादीच्या शहापूर तालुका कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.यावेळी राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी कार्याध्यक्ष अरुण मांजे यांना पुष्पगूच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. पक्ष विस्तार करण्याच्या दृष्टीने पक्षाने तालुका कार्यकरणीच्या रचनेत काही प्रमाणात बदल करत कार्याध्यक्ष पदाची घोषणा केली. दरम्यान मागील २५ वर्षांपासून अरुण मांजे हे राष्ट्रवादी पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते म्हणुन काम करीत आहेत.मागील झालेल्या विधानसभा निवडणुकीत अरुण मांजे यांनी विशेष मेहनत घेतली होती.2024 च्या विधानसभा निवडणूक विजयात अरुण मांजे यांनी विशेष योगदान दिले होते.त्यांचा जनसंपर्क दांडगा असून एक सोज्वळ व्यक्तिमत्व म्हणुन त्यांच्याकडे पाहिले जाते. तथापि आगामी स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळयासमोर ठेऊन पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी पक्ष संघटन बांधणीच्या दृष्टीकोनातून या नियुक्त्या करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.स्थानिक स्वराज्य संस्थेवरही राष्ट्रवादीचा वरचष्मा कायम रहावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने युवकांना संधी देण्याचे धोरण ठरवले आहे.

**मागील झालेल्या विधानसभा निवडणुकीत अरुण मांजे यांनी विशेष मेहनत घेतली होती.2024 च्या विधानसभा निवडणूक विजयात अरुण मांजे यांनी विशेष योगदान दिले होते.**

# जेएसडब्ल्यू कंपनीच्या जनसुनावणीत स्थानिकांनी विरोध करण्याचे आवाहन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : जेएसडब्ल्यू कंपनीचा विस्तार करताना कंपनी प्रशासनाने स्थानिक रहिवाशांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेतल्या. स्थानिकांना नोकऱ्या भेटतील या आशेवर स्थानिक ग्रामस्थांनी आपल्या जमिनी कंपनी प्रशासनाला दिल्या. मात्र कंपनी प्रशासनाने स्थानिकांना नोकर भरती प्रक्रियेमध्ये डावलले असल्याने स्थानिक बेरोजगार युवकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे तसेच ज्या थोडा-थोडक्या भूमिपुत्रांना कंपनीने नोकरीत सामावून घेतले आहे अशा स्थानिक युवकांना जाणीवपूर्वक कर्नाटक राज्यात बेल्लारीच्या प्लांटमध्ये पाठवून त्यांना हैराण करण्यात येते त्यामुळे स्थानिक नागरिकांनी जय डब्ल्यूच्या जन सुनावणीला कायम विरोध करावाअसे माजी जिल्हा परिषद सभापती संजय जांभळे यांनी वडखळ येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

जेएसडब्ल्यू कंपनीमध्ये कोक ओव्हन या प्रकल्पाचे विस्तारीकरण होणार आहे सध्या जो कोक ओव्हन प्रकल्प सुरू आहे त्या प्रकल्पामुळे प्रचंड प्रमाणात वायू प्रदूषण होत आहे आणि या वायू प्रदूषणाचा विपरीत परिणाम येथील स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. स्थानिक नागरिकांमध्ये कॅन्सर सारख्या भयानक आजाराचे प्रमाण वाढत असल्याचेही संजय जांभळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. बेरोजगारी आणि येथील स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर होत असलेल्या विपरीत दुष्परिणामांमुळे कंपनीमध्ये कोक ओव्हन या प्रकल्पाच्या विस्तारी करणासाठी २२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जनसुनावणीच्या वेळी स्थानिक नागरिक कंपनीच्या विस्तारीकरणाला विरोध दर्शवणार आहेत असे संजय जांभळे यांनी सांगितले. तसेच स्थानिकांनी कंपनी प्रशासनाच्या दबावतंत्राला बळी न पडता सर्व स्थानिकांनी या जनसुनावणीत सदर प्रकल्पाला विरोध दर्शवावा असे आवाहन संजय जाभळे यांनी स्थानिकांना केले.

# पडघा पोस्ट कार्यालयात कर्मचारी संख्या वाढवा

## - नागरीकांची मागणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील पोस्टातील कामाचा ताण कमी करण्यासाठी कर्मचारी संख्या वाढविण्याची मागणी नांगरीकानी केली आहे.

पडघा येथील गणपती मंदीर समोरील गल्लीत एका छोट्याश्या जागेत पोस्टाचे कार्यालय असुन दररोज शेकडो नागरीक विविध कामासाठी पोस्टात येत असतात या पोस्टात रजिस्टर पार्सल, स्पीड पोस्ट, मनीऑर्डर, आर. डी. (बचत खाते) पीपीएफ. सुकन्या योजना, 1टीडी, 2टीडी, (सेव्हिंग योजना) या कामाबरोबर शासकीय योजनांचे पैसे सुध्दा पोस्टातील खात्यात जमा होत असल्याने या पोस्टात दररोज शेकडो नागरीकांची गर्दी होत असते. तसेच ही सर्व कामे ऑनलाईन पध्दतीने होत असल्याने ही कामे करण्यासाठी केवळ एक पोस्टमास्तर आणी परिसरातील 45 खेडी, पाडी, गावातील व परिसरातील वाढत्या गोदामामुळे छोटे, मोठे पार्सल, रजिस्टर टपाल, सर्वसाधारण टपाल, मनीऑर्डर वितरीत करण्यासाठी 3 आऊटसायडर(पोस्टमन) कार्यरत आहेत.तसेच परिसरात गोदाम व लोकसंख्या झपाट्याने वाढत असुन परिणामी संर्वांवर कामाचा ताण वाढुन कामे करण्यास विलंब लागत आहे.तर बचत खाते उघडल्यानंतर पासबुक व ईतर योजनेत पैसे गुंतवल्यास त्याची कागदपत्रे मिळण्यास महीना लागत असल्याचे येथील खातेदार व्यवसायीक अशोक गायकवाड यांचे म्हणणे असुन या पोस्ट कार्यालयात कायमस्वरूपी पोस्टमास्तर व दोन लिपीक व इतर कर्मचारी वाढविण्याची मागणी गायकवाड व परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# शासनाचे स्तुत्य उपक्रम जनतेपर्यंत पोहचवा

## - मनोज सानप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : पत्रकार हा लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे समाजाला चांगले वळण देण्याची जबाबदारी आपल्या सर्वावर आहे.

या स्पर्धेचा युगात बातमीदारी करताना काळजीपूर्वक करावी आपल्या बातमीमुळे एखाद्याचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.शासनाकडून लोकांसाठी स्तुत्य उपक्रम व योजना राबविण्यात येतात त्या सर्व सामान्य माणसा पर्यंत पोहचविण्यासाठी पत्रकारांनी मेहनत घेणे आवश्यक आहे असे मत ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप यांनी भिवंडी झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले.

स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने भिवंडीतील पत्रकारांना पावसाळी रेनकोट वाटप व मोफत आरोग्य शिबिर भिवंडी तालुक्यातील वळगांव ग्रामपंचायत कार्यालय सभागृहात आयोजित करण्यात आले होते. प्रसंगी विशेष पाहुणे म्हणून जिल्हा माहिती अधिकार मनोज सानप, सरपंच सचिन पाटील, ग्रामपंचायत अधिकारी राकेश जोशी, आरोग्यम् धनसंपदा फाउंडेशन कल्याणचे अध्यक्ष जितेंद्र पाटील, स्वराज्य तोरण चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष डॉ.किशोर पाटील, श्रीमती संध्याताई पवार, राजेंद्र काबाडी, सुरजपाल यादव अदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. शासन व जनता यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून पत्रकार काम करत असतो त्यामुळे बातमीदार प्रतिनिधी यांनी अतिशय जबाबदारीने काम करणे आवश्यक आहे.

समाजाच्या जडणघडण, सुधारणा व विकासाची भूमिका ही महत्त्वाची असते त्यामुळे प्रत्येकाने संघटीत होऊन एकनिष्ठेणे काम करावे, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयातून सर्व पत्रकारांना योग्य सहकार्य केले जाईल असे आश्वासन मनोज सानप यांनी यावेळी दिले.प्रसंगी पत्रकारिता करताना मेहनत घेऊन कायद्याचे शिक्षण (एलएलबी) पूर्ण करून वकील झालेले जेष्ठ पत्रकार शरद भसाळे, संतोष चव्हाण, सोमनाथ ठाकरे, रवि वर्मा, मोनिश गायकवाड, नितीन पंडीत यांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि गौरवपत्र .

देऊन मान्यवरांच्या हस्ते करण्यात सत्कार करण्यात आला. यावेळी इतरही मान्यवरांनी मनोगत व्यक्त केली. उपस्थिताचे पत्रकार किशोर पाटील यांनी स्वागत केले तर सुत्रसंचालन मनोहर तरे आभार प्रदर्शन आचार्य सुरजपाल यादव यांनी केले.


जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित

**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


# भिवंडीत संत नामदेवांचा ६७५ वा संजीवन समाधी सोहळा साजरा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : श्री.संत शिरोमणी नामदेव सेवा प्रतिष्ठान व नामदेव शिंपी समाजाच्यावतीने श्री संत शिरोमणी नामदेव महाराज यांचा 675 वा संजीवन समाधी सोहळा आज दुपारी भिवंडी व संपूर्ण ठाणे जिल्ह्यात मोठ्या भक्तिमय उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. या निमित्ताने सर्वत्र भजन, प्रवचन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमास मोठ्या संख्येने समाज बांधव आणि नागरिक उपस्थित होते.

भिवंडी शहरातील श्री गोपाळकृष्ण मंदिर सभागृहात सकाळी संजीवनी समाधीसोहळ्या निमित्त ह.भ.प.भागवताचार्य श्री.गणेश महाराज पुलकुंठवार किर्तन सोहळा व महाआरती करण्यात आली. निमित्ताने शेकडो समाज बांधवांसह भाविकांनी संत नामदेव महाराज व विठ्ठल-रखुमाई मुर्तीचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी समाजाचे अध्यक्ष महेंद्र माडकर यांच्या हस्ते ह.भ.प.भागवताचार्य श्री.गणेश महाराज पुलकुंठवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ठाणे जिल्ह्याचे जेष्ठ विधीतज्ञ नारायण अय्यर, महापालिकेचे माजी सभागृह नेते प्रशांत लाड, प्रदीप राका, निलेश आळशी, सिनेअभिनेत्री स्वाती कर्णेकर, अदित्य शेटे व नामदेव शिंपी फोरम सदस्य ठाणे यांच्या सह मान्यवर सामाजिक कार्यकर्ते व शालेय विद्यार्थीचा गौरव करण्यात आला.भिवंडी, कल्याण सह डोंबिवली, ठाणे, वाडा, पालघर, जव्हार सह संपूर्ण ठाणे जिल्ह्यातसह संजिवनी समाधी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्याची माहिती ठाणे जिल्हा शिंपी उन्नती मंडळाचे प्रमुख रविंद्र कालेकर, महेंद्र माडकर, भानुदास भसाळे, यांनी दिली.

*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*